# ० जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा कोल्हापूर

महिला स्वयंसहायता बचत गट सक्षमीकरण अभियान २०१२-१३

**पार्श्वभूमी -**

भारतामध्ये स्वातंत्र्योत्तर काळामध्ये महिला सक्षमीकरणासाठी घटनात्मक तरतूद, तसेच अन्य कायदे अस्तित्वात आले तरी देखील महिलांची सामाजिक - आर्थिक प्रगती,

निर्णय प्रक्रियेतील सहभाग अपेक्षेप्रमाणे वाढलेला दिसून येत नाही. शासनाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी अन्य योजाना सुरु केलेल्या आहेत. परंतु ग्रामीण भागातील महिलांची आजची आर्थिक/सामाजिक स्थिती व निर्णय प्रक्रियेतील सहभाग फारच कमी दिसून येतो.

उदा.- ग्राम सभेला आजही महिलांची उपस्थिती फारशी दिसून येत नाही.महिलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. महिलांच्या आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत.आर्थिक स्वावलंबन फारसे आढळून येत नाही.

**अभियानाची उद्दिष्टये :**

- ग्रामीण भागातील महिलांना स्वयंसहाय्यता बचत गटांच्या माध्यमातून एकत्र आणून त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणने.
- ग्रामीण भागातील महिलांमध्ये प्रसार , प्रसिध्दी व प्रशिक्षणाद्वारे जनजागृती करणे.
- ग्रामीण भागातील महिलांमध्ये शिक्षण ,आरोग्य, कुटुंब कल्याण, आर्थिक स्वावलंबन इ.बाबत प्रशिक्षण देवून जागृती निर्माण करणे.
- ग्रामीण भागातील महिलांचे संघटन करुन निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग वाढविणे.
- शासनाच्या विविध योजानांची व उपक्रमांची सातत्याने माहिती देवून या महिलांना योजानांच्या अंमलबजावणी मध्ये सहभागी करुन घेणे.
- ग्रामीण भागातील बचत गटांच्या स्थायी विकासासाठी संस्थात्मक संरचना निर्माण करुना ती बळकट करणे.
- आर्थिक स्वावलंबाासाठी विविध उदयोग, व्यवसायासाठी प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी विकसित करणे.

**अभियानातील घटक -**

- स्वयंसहायता बचत गट सर्व्हेक्षण व बचत गटांची नोंदणी करणे.
- स्वयंसहाय्यता गटांची स्थापना व क्षमता वृध्दींगत करणे.
- स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांना प्रशिक्षण देणे.
- महिलांचे संघटन करणे.
- स्वयंसहाय्यता गटांचे उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे.
- बचत गटांच्या मार्फत विविध प्रकारचे व्यवसाय व सेवा-उदयोग सुरु करुन आर्थिक स्वावलंबन वाढविणे.
- महिला सक्षमीकरण अभियानाचे सनियंत्रण करणे.

**.महिला सक्षमीकरण अभियान कृती कार्यक्रम**

**१ स्वयंसहायता बचत गटांचे सर्व्हेक्षण करणे-**

सदया अस्तिवात असणारे बचत गट त्यामध्ये बि.पी.एल. व ए.पी.एल बचत गट असे प्रकार असल्याने त्यांचे सर्व्हेक्षण होणे गरजेचे आहे. त्यावरून आपणास बी.पी.एल. व ए.पी.एल.बचत गटांची पुर्णपणे सदयस्थिती समजून येईल त्यानुसार त्यांचा सर्वागिण विकास होण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करण्यास मदत होईल.

**२ बचत गटांची नोंदणी -**

स्वयंसहायता बचत गटांचे सर्व्हेक्षण पूर्ण झाल्यांनतर या बचत गटांची ग्रामपंचायत मध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी एक विहीत नमुणा तयार करून त्याप्रमाणे रजिस्टर ठेवण्यात आल्यास चालु बचत गट, विस्कळीत बचत गट, बंद बचत गट याची पडताळणी करण्यास मदत होईल.

**३. ग्रामस्तरावर प्रेरिका नेमणे-**

प्रत्येक ग्रामपंचायत गाव पातळीवर एक ग्रामपंचायत एक प्रेरिका अशा पध्दतीने असणे आवश्यक आहे. या प्रेरिका त्यांच्यात गावातिल बचत गटांचे कामकाज करतील.

**अ. खालील प्राधान्यक्रमानूसार प्रेरिकांच्या नेमणूका करण्यात याव्यात.**

१) त्याच गावातील स्वयंसहाय्यता गटाची सदस्य असलेल्या महिलेची ग्राम स्तरावर प्रेरिका म्हणून नेमणूक करता येईल. यासाठी बचत गट स्थापना होऊन ५ वर्षे कालावधी झाला आहे व या गटाने सातत्य ठेवून कर्ज परतफेड केलेली आहे. अशा गटांतील ७ वी पास महिला.

२) ग्राम पंचायत हद्दीमधील काम करणारी इ.१० वी पास अंगणवाडी कार्यकर्ती /आशा व पदवीधर /एनजीओ प्रतिनिधी /नोंदणीकृत स्थानिक संस्था प्रतिनिधी हे इच्छुक असल्यास प्रेरिका म्हणून काम करु शकतील.
३) ग्राम पंचायत क्षेत्रातील पदवीधर महिला.

वरील निकषाप्रमाणे पात्र असलेल्या महिलांमधून नेतृत्वगुण, ग्रहणशक्ती असणारी, पुरेसा वेळ देऊ इच्छिणारी, कार्यतत्पर, महिलांच्या विकासासाठी समर्पित भावना असणा-या महिला प्रेरिकेची ग्राम पंचायतीने निवड करुन प्रस्ताव गट विकास अधिकारी यांचेकडे अंतिम मान्यतेसाठी पाठवावा.

**ब.प्रेरिका निवड प्रकिया-**

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी | अध्यक्ष |
| बाल विकास प्रकल्प अधिकारी | सदस्य सचिव |
| विस्तार अधिकारी(एसजीएसवाय) | सदस्य |

वरील समितीमार्फत निवड केल्याांतर ही निवड मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपातील राहील. या नेमणूकीमुळे कोणत्याही शासकीय नोकरीमधील नेमणूकीबाबतचा हक्क रहाणार नाही. दरवर्षी ११ महियाच्या कालावधीनंतर केलेल्या कामाचे मूल्यांकन केले जाईल. मूल्यांकनामध्ये झ ाालेले काम समाधान कारक असल्यासच पुढील कालावधीसाठी मानाधनी सेवेवर नवीन ११ महिन्याच्या कालावधीसाठी सेवा उपलब्ध करुन घेतल्या जातील.

**क. कालावधी** :

- ही निवड प्रक्रिया दि.१० जुलै ते ३१ ऑगस्ट २०१२ या कालावधीमध्ये संपूर्ण विभागामध्ये पार पाडण्यात यावी.

**ड. प्रेरिकाची जबाबदारी व कर्तव्ये ...**

ग्राम स्तरावर स्वयंसहाय्यता गट निर्मिती, बँक जोडणी, प्रशिक्षण, रेकॉर्ड ठेवणे, मार्गदर्शन इत्यादीसाठी एका संघासाठी (१० ते २० गटासाठी) एक प्रेरिका म्हणजेच एका ग्रामपंचायतीला एक या प्रमाणे नेमणेत येईल. ही प्रेरिका खालील कार्यक्रम राबवून महिलांचे स्वयंसहाय्यता गटाचे सक्षमीकरण करेल.

**इ. प्रेरिकांनी खालील सामाजिक कार्यक्रम व बचत गटासंबंधीचे कामकाज करावे.**

१) हळदी कुंकू कार्यक्रम.
२) माता बालक संघाची स्थापना करुना त्यांचे मेळावे घेणे.
३) किशोरी मुलींचे गट स्थापन करुन मेळावे घेणे.
४) सासू सूना मेळावे आयोजित करणे.
५) आजी आजोबांचे मेळावे आयोजित करणे.
६) भजनी मंडळ, युवक युवती मंडळ स्थापन करणे.
७) संघामधील २० गट स्थापन/पुर्नजिवीत करणे, गटास खेळते भांडवल उपलब्ध करुन देणे, मुख्य व्यवसायासाठी कर्ज वा अनुदान उपलब्ध करुन देणे.
८) स्वयं. गटाच्या साप्ताहीक /पंधरवडा / मासिक बैठकांना उपस्थित राहून मार्गदर्शन करणे.

९) संघातील स्वयंसहाय्यता गटांना सर्व प्रकारचे प्रशिक्षण देणेसाठी फॅसिलिटेशन करणे.
१०) संघातील स्वयंसहाय्यता गटांना बाजार व्यवस्थेसाठी फॅसिलिटेशन करणे.
११) संघातील सर्व स्वयंसहाय्यता गटांचे दप्तर अदयावत ठेवणेसाठी मार्गदर्शन करणे व सर्व दप्तर अदयावत राहील याची खातरजमा करणे.
१२) स्वयंसहाय्यता गटाच्या संघाचे रजिष्ट्रेशन करणे व सक्षमीकरण करणेसाठी आवश्यक त्या सर्व बाबी करणे.
१३) प्रेरिका यांनी दारिद्रय रेषेवरील किंवा दारिद्रय रेषेखालील स्वयंसहाय्यता गटांना स्वतंत्र संघ निर्माण करणे आवश्यक राहील.

**ई. प्रेरिका मानधन--**

एका प्रेरिकेला दरमहा रु.१०००/- याप्रमाणे मानधन देण्यात यावे. मानधन ग्रामपंचायती मार्फत धाादेशाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रेरिकेच्या महिन्याभरातील कामांचे मूल्यांकन करून काम समाधान कारक असल्यासच ग्रामसेवकामार्फत मानधन वितरीत होईल. जोपर्यत संघ स्थापन होत नाही तोपर्यत कामाचे मूल्यांकन करुना रक्कम वितरीत करावी.

१. **ग्रामपंचायतींच्या उत्पन्नानुसार प्रेरिका मानधन अदा करणे.**

**अ.** ज्या ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न रू.एक लाख पेक्षा जास्त आहे.त्यांनी प्रेरिकेस दरमहा रू.१०००/- एक हजार अदा करणेचे आहे.

ब. ज्या ग्रामपंचायतींचे वार्षिक उत्पन्न रू.एक लाख पेक्षा कमी आहे.त्यांनी प्रेरिकेस दरमहा रू.१०००/- एक हजार अदा करणेसाठी ग्रामपंचायत फंडातून दरमहा रु.५००/- व महिला बाल कल्याण जिल्हा परिषद फंडातून रू.५००/- अदा करावेत.

**प्रेरिका प्रशिक्षण.-**

१.ग्राम स्तरावरील प्रेरिकांना तीन दिवसाचे निवासी पायाभूत प्रशिक्षण व दरमहा एक दिवसाचे उजळणी प्रशिक्षण देण्यात यावे.
२. पायाभूत प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण मोडयूल तयार करुन त्याप्रमाणे प्रशिक्षण देण्यात यावे.
अ. मूलभूत प्रशिक्षण,
ब. दरमहा उजळणी प्रशिक्षण,
क. व्यवसाय प्रशिक्षण यांचा समावेश असावा.

प्रेरिका प्रशिक्षणासाठी लागणारा निधी प्रेरिकांचे प्रशिक्षणाचा खर्च जिल्हा परिषदेकडील महिला विभागांकडील १० टक्के रकमेमधून करण्यात येईल. यासाठी आवश्यक एवढा निधी जिल्हा परिषदेने दयावा.

# प्रेरिका प्रशिक्षण मॉडेल (मुलभूत तिन दिवसीय)

| अ.न | दिवस | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | पहिला | • बचत म्हणजे काय ?<br>• बचतीचे फायदे कोणते ?<br>• स्वयंसहाय्यता बचत गटाची मूलभूत संकल्पना ?<br>• स्वयंसहाय्यता बचत गटाची वैशिष्टये ? | एक तास<br>एक तास<br>एक तास<br>एक तास |

| अ.न | दिवस | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| 2 | दुसरा | • स्वयंसहाय्यता बचत गटात येण्यापूर्वी व बचत गटात येण्यापूर्वी व बचत गटात आल्यानंतर महिलांची स्थिती यावर चर्चा<br>• बचत गटांचे विवीध स्तर व महिला सक्षमीकारणाच्या प्रक्रियेमध्ये स्वंयंसहाय्यता बचत गटाचा दबाव गट म्हणून भूमिका<br>• प्रेरिकेच्या अंगी असलेली आवश्यक कौशल्य<br>• गटांर्तगत नियमांचे महत्व<br>• बचत गटांचे ग्रेडेशन प्रथम व दुसरे | एक तास<br>एक तास<br>एक तास<br>एक तास |

| अ. | दिवस | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| 3 | तिसरा | • बॅक व तत्सम बाहेरिल संस्थासोबत समवयाची गरज व महत्व<br>• प्रकल्प अहवाल तयार करणे<br><br>• नेतृत्व बदलाची आवश्यक्ता काय ?<br>• नेतृत्व बदलाची पध्दती कोणती ?<br>• बचत गट विकासाचे टप्पे | एक तास<br>एक तास<br>एक तास<br><br>एक तास<br>एक तास |

**स्वयंसहाय्यता बचत गटांना प्रशिक्षण-**

१) दोन दिवसाचे पायाभूत प्रशिक्षणाचे मोडयूल तयार करण्यात यावे. दोन दिवसाचे पायाभूत प्रशिक्षण सर्व स्वयंसहाय्यता गटाना स्थापनेपासन दोन महिन्याच्या कालावधीमध्ये देण्यात यावे. हे प्रशिक्षण गाव स्तरावर दयावे. यासाठी इतर तज्ञ व्यक्तींची मदत घ्यावी.

२) पायाभूत प्रशिक्षणामध्ये गट स्थापनेचे महत्व, गट संकल्पना, गट नियमावली, तत्वे, रेकॉर्ड ठेवणे, संघाचे नियम, कॅशबुक, पासबुक, इतिवृत्त, भौगोलिक व प्रशासकीय यंत्रणे बाबतची माहिती, पंचसूत्रीचे महत्व इत्यादी बाबीबद्दल असावे.

३) कौशल्यवृध्दीचे प्रशिक्षण स्थानिक व्यवसाय किंवा गटाच्या गरजेनुसार असावे. व्यवसाय प्रशिक्षण हे क्लस्टर ॲप्रोच ठेवून देण्यात यावे. व्यवसायासाठीचे प्रशिक्षण प्रथमत: स्थानिक ॲक्टीव्हीटीच्या व्हॅल्यूॲडिशासाठी असावे.

४) बचत गटाच्या मासिक बैठकीमध्ये विवीध शायकीय विभागाकडील योजनांचा नवनविन विषयांचा समावेश असावा उदा.रेशा कार्ड काढणे,बॅक खाते उघडणे,जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले.महिलांच्या शैक्षणिक व आरोग्य योजना इत्यादी.

५) फर्स्ट ग्रेडेशन व सेकंड ग्रेडेशनचे सविस्तर मार्गदर्शन असावे. बॅकींग संदर्भात सविस्तर प्रशिक्षण असावे.

**२. स्वयंसहाय्यता बचत गट प्रशिक्षण- कालावधी दोन दिवस**

| अ. | दिवस | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | पहिला | • बचत म्हणजे काय ? कशाची ? कशासाठी ?<br>• स्वयंसहाय्यता बचत गट म्हणजे काय ?<br>• बचत गट अध्यक्ष, सचिव,व सदस्य यांची भूमिका व जबाबदारी<br>• व्यक्तीमत्व विकास | एक तास<br>एक तास<br>एक तास<br><br>एक तास |

| अ.-न. | दिवस | विषय | कालावधी |
|---|---|---|---|
| 2 | दुसरा | • बचत गट लेखा हिशोबाचे महत्व ?<br>• बचत गट प्रतवारी बाबत मार्गदर्शन<br>• बचत गट बॅक सलग्नता प्रस्ताव तयार करणे ?<br>• बचत गट प्रकल्प अहवाल तयार करणे ?<br>• प्रशिक्षण बाबत प्रशिक्षणार्थीचे अनुभव कथन | एक तास<br>एक तास<br><br>एक तास<br>एक तास |

## अभियान कृती आराखडा.

| अं-।. | घटकाचे नाव | जबाबदार युनिट | नियोजना व आयोजन जबाबदारी |
|---|---|---|---|
| 1 | बचत गट सर्वेक्षण | पंचायत समिती | विस्तार अधिकारी ,ग्रामसेवक |
| 2 | प्रेरिका िवड करणे | पंचायत समिती. | सी.डी.पी.ओ. |
| 3 | नविन बचत गट स्थापन करणे | प्रेरिका | प्रेरिका |
| 4 | संघ स्थापा करणे व नोंदणी करणे | विस्तार अधिकारी | विस्तार अधिकारी |
| 5 | करारतत्वावर कसलटंट - नेमणे1.प्रशिक्षण 2.मार्केटींग | जि.ग्रा.वि.य. | जि.ग्रा.वि.य. |
| 6 | तासिका तत्वावर तज्ञ मार्गदर्शक नेमणे. 1.सामाजिक संघटीकीकरण2.जिवन्नोती .3.कायदेविषयक तज्ञ 4.आरोग्य विषयक 5.वित्तीय तज्ञ 6.उदयोजकता विकास तज्ञ | जि.ग्रा.वि.य. | जि.ग्रा.वि.य. |
| 7. | प्रेरिकांचे प्रशिक्षण मुलभूत तीन दिवसीय | पंचायत समिती | प्रेरिका ,व नियुक्त एन.जी.ओ. |

| | | | |
|---|---|---|---|
| 8 | प्रेरिकांचे उजळणी प्रशिक्षण<br>प्रत्येक महिन्यातून एक एक दिवसीय | पंचायत समिती | प्रेरिका ,व नियुक्त एन.जी.ओ. |
| 10 | बचत गट प्रतवारी व प्रकल्प अहवाल तयार करणे बाबत प्रशिक्षण | पंचायत समिती | प्रेरिका ,व नियुक्त एन.जी.ओ. |
| 11 | बचत गट उदयोजकता जाणिव जागृती प्रशिक्षण | पंचायत समिती | प्रेरिका ,व नियुक्त एन.जी.ओ. |
| 12 | बचत गट कौशल्यवृध्दी प्रशिक्षण | पंचायत समिती | प्रेरिका ,व नियुक्त एन.जी.ओ. |
| 13 | संघनक हाताळणी प्रशिक्षण | पंचायत समिती | प्रेरिका ,व नियुक्त एन.जी.ओ. |

## सामाजिक जाणिव जागृती कार्यक्रम--

| | | | |
|---|---|---|---|
| 14 | स्त्री भ्रुण हत्या प्रतिबंध जाणिव जागृती कार्यक्रम | आय सी डी एस. | प्रेरिका ,व प्राथमिक आरोग्य केद्र वैदयकीय अधिकारी |
| 15 | किशोरवयीन मुलींची कार्यशाळा | आय सी डी एस | प्रेरिका व उपकेंद्र आरोग्य सेविका |
| 16 | कुपोषण विषयक कार्यशाळा | आय सी डी एस | प्रेरिका,अंगणवाडी पर्यवेक्षिका |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | हुंडा प्रतिबंध कार्यशाळा | आय.सी.डी.एस. | प्रेरिका,अंगणवाडी पर्यवेक्षिका |
| 18 | एच आय व्ही एडस प्रतिबंध जाणिव जागृती कार्यक्रम | तालुका आरोग्य विभाग | प्रेरिका तालुका आरोग्य विस्तार अधिकारी व प्रा.आ.केंद्र एम.ओ. |
| 19 | हिमोग्लोबिन तपासणी कार्यक्रम | प्रा.आ.केंद्र | प्रेरिका व एम. पी. डब्ल्यु |
| 20 | र्निमल ग्राम जाणिाव जागृती कार्यक्रम | पंचायत स. ग्रापं | ग्रामसेवक -प्रेरिका |
| 21 | वृक्षारोपन कार्यक्रम | पंचायत स.कृषी | कृषी सहा.ग्रामसेवक प्रेरिका |
| 22. | ग्रामपंचायत ग्रामसभेमध्ये महिलांचा सहभाग | पंचायत स ग्रापं | विस्तार अधिकारी ग्रांप. प्रेरिका |

## सनियंत्रण समित्या-

अभियान यशस्वी करण्याच्या उददेशाने समित्या स्थापन करणे आवश्यक असून जिल्हास्तरावरजिल्हा सनियंत्रन समिती स्थापन करून हि समिती पूर्ण अभियान सनियंत्रण करेल.ती खालील प्रमाणे असावी.

**अ. जिल्हा सनियंत्रण समिती-**

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष |
| प्रकल्प संचालक | सदस्य सचिव |
| सभापती (महिला बाल कल्याण) | सदस्य |
| उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) | सदस्य |
| महाव्यवस्थापक नाबार्ड | सदस्य |
| जिल्हा अग्रणी बॅंक व्यवस्थापक | सदस्य |
| गट विकास अधिकारी , | सदस्य |
| गट विकास अधिकारी , | सदस्य |
| बाल विकास प्रकल्प अधिकारी, | सदस्य |
| बाल विकास प्रकल्प अधिकारी, | सदस्य |

**कार्ये -**

1.दर महिन्याला एक आढावा बैठक घेवून उदिष्टानूसार कामकाजाचे सनियंत्रन करेल .

2.वेळोवेळी प्राप्त मार्गदर्शक सूचनानूसार अभियान यशस्वी करण्यात प्रभावी कार्य करेल.

## ब.तालुका सनियंत्रण समिती ..-

| | |
|---|---|
| गट विकास अधिकारी , | अध्यक्ष |
| बाल विकास प्रकल्प अधिकारी, | सदस्य सचिव |
| विस्तार अधिकारी (उद्योग)- प्रतिाधिी | सदस्य |
| ग्रामसेवक प्रतिाधिी - २ | सदस्य |
| बँक शाखा व्यवस्थापक | सदस्य |
| तालुका संघ प्रतिनिधी | सदस्य |
| स्वयंसहाय्यता संघ प्रतिनिधी (दोन) | सदस्य |
| स्वयंसहाय्यता गट प्रतिाधिी (दोन) | सदस्य |

तालुकास्तरीय समितीची दरमहा एक बैठक होईल.

## क.गावपातळीवरील सनियंत्रण समिती.-

| अ.नं | पदाधिका-याचे नाव | पद |
|---|---|---|
| १. | .सरपंच | अध्यक्ष |
| २. | ग्रामसेवक | सदस्य सचिव |
| ३. | सर्व बचत गटांचे प्रतिनीधी | सदस्य |
| ४. | तंटा मुक्त अध्यक्ष | सदस्य |
| ५. | पोलीस पाटील | सदस्य |
| ६. | तलाठी | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७. | कृषी सहाय्यक | सदस्य |
| ८. | अंगणवाडी सेविका | सदस्य |
| ९. | आरोग्य सेविका | सदस्य |

वरील प्रमाणे गावपातळीवर समिती करण्यात यावी .

**कार्ये -**

१.सर्व बचत गटांचे कामकाज योग्य पध्दतीने होण्यासाठी गटांना प्रेरणा व मार्गदर्शन देणे.
२.प्रेरिकेच्या कामावर सनियंत्रण करणे.
३.विवीध शासकीय विभागाकडील योजनांची माहिती देणे.
४.गटांचे लेखे अदयावत ठेवणेसाठी प्रेरिकेमार्फत पाठपूरावा करणे.
५.बचत गटांमध्ये समन्वय ठेवणे.
६.ग्रामसेवा संघ स्थापन करणे साठी महिलांना प्रेरित करणे.
७.दरमहा समितीची मासिक बैठक घेवून बचत गटांचा मासिक प्रगती अहवाल सनित्रण करणे.

वरील प्रमाणे या समितीने कामकाज करून अभियान यशस्वी करण्यात सहकार्य करावे.